
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 19 एप्रिल 2026 | अंक क्र. 329 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




## परळीत भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळा; संत जगमित्र नागा मंदिर येथे पूजा व कीर्तनाचे आयोजन



■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

येथील श्री संत जगमित्र नागा मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. रविवार, दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ठीक १२ वाजता हा मुख्य जन्मोत्सव सोहळा पार पडणार आहे अशी माहिती संत जगमित्र नागा मंदिर चे वंशपरंपरागत पुजारी उदय भैय्या औटी यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून सकाळी भगवान परशुराम यांचा विधिवत अभिषेक करण्यात येईल. दुपारी १२ वाजता गुलाल उधळून जन्मोत्सव साजरा होणार आहे. या निमित्ताने उदगीर येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. संतोष महाराज श्रीडोळे यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. तरी या जन्मोत्सव सोहळ्यास आणि कीर्तन श्रवणाचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन 'सर्व परशुराम भक्त मंडळ' यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## अतिक्रमण हटाव मोहिम : परळीतील व्यापाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद !

### नगर परिषद प्रशासन आणि व्यापारी यांच्या समन्वयातून मोहीम यशस्वी करण्याचा निर्धार

■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी नगर परिषदेकडून शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सध्या वेगाने सुरू असून, या पार्श्वभूमीवर मोंढा मार्केट परिसरातील व्यापाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शहर स्वच्छ, सुंदर आणि वाहतुकीसाठी सुरळीत करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या या मोहिमेला व्यापाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

अतिक्रमणामुळे रस्ते अरुंद होऊन वाहतूक कोंडी वाढते, ग्राहकांना दुकानांपर्यंत पोहोचणे कठीण होते, अपघातांचा धोका वाढतो तसेच मान्सूनपूर्व नालेसफाईत अडथळे निर्माण होतात. याशिवाय शहराच्या सौंदर्यावरही विपरीत परिणाम होत असल्याचे मत सर्वच उपस्थितांनी मांडले.चर्चेदरम्यान वाढत्या अतिक्रमणामुळे शहराच्या विकासाला अडथळा निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे, अतिक्रमणाचा सर्वाधिक फटका हा व्यापाऱ्यांनाच बसत असल्याचेही बैठकीत अधोरेखित झाले. पार्किंगची अडचण आणि मोकळ्या जागेअभावी ग्राहक अन्यत्र वळत असल्याने व्यापारावर परिणाम होत असल्याची बाब समोर आली. बैठकीत अनेक व्यापाऱ्यांनी स्वखुशीने अतिक्रमण काढून घेण्याचे आश्वासन दिले. नगर परिषद प्रशासन आणि व्यापारी संघटनेच्या समन्वयातून मोंढा मार्केट परिसरात ही मोहीम प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. स्वच्छ, सुंदर आणि अतिक्रमणमुक्त शहर घडविणे ही केवळ प्रशासनाची




नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. परळी शहरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर अतिक्रमणं मोठ्या प्रमाणावर झालेली आहेत. अतिशय सुटसुटीत व वाहतूकीला विना अडथळाअसे समर्पक रुंद रस्ते असतांनाही वाहतूक कोंडी, अस्ताव्यस्त रचना आणि बेशिस्त पार्किंग यामुळे सर्वांनाच प्रचंड त्रासातून जावे लागत आहे. त्यामुळे आपणच आपले शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध करुया ,हे सर्वांसाठीच आवश्यक आहे हा परळीकर व्यापारी, व्यावसायिक व सर्व नागरिकांचा मनापासून निर्धार आहे.त्यामुळेच नगर परिषद प्रशासन आणि परळीकर व्यापारी यांच्या समन्वयातून मोहीम यशस्वी करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला आहे.

हनुमान मंदिर, मोंढा मार्केट येथे झालेल्या या बैठकीला माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधीकारी, बाजार समितीचे संचालक जयपाल लाहोटी,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड, नंदकिशोर बियाणी, बंडु गरुड,संदीप लाहोटी, शंकर आडेपवार, नितीन समशेट्टी, पारसेवार, गोपाळ कंकाळ आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नगर परिषदेचे अधिकारी, विविध व्यापारी महासंघाचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने व्यापारी बांधव उपस्थित होते.

## सोनाई कारखान्याचा 2700 रु प्रमाणे 1 ते 15 फेब्रुवारी 2026 या कालावधीत गेलेल्या ऊस उत्पादकांना ऊसाचा पहिला हप्ता महेश बँकेत वर्ग!

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

सोनाई अँग्रो कारखान्याचे चेअरमन प्रा.टी.पी.मुंडे सरांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचा 2700 रुपये प्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचा पहिला हप्ता दिनांक 1 ते 15 फेब्रुवारी 2026 या कालावधीत कारखान्यास ऊस गेलेल्या शेतकऱ्यांचा ऊसाचा हप्ता महेश को-ऑपरेटिव्ह बँक शाखा परळी वैजनाथ येथे वर्ग करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन आत्माराम



कराड व संचालक प्रा. विजय मुंडे दिली आहे. कारखाना सुरू झाल्यापासून 15 फेब्रुवारी महिन्याच्या तारखेपर्यंत शेतकऱ्यांच्या ऊसाची बीले बँकेत वर्ग करण्यात आली आहेत त्यामुळे परिसरातील शेतकरी बांधव आनंद व्यक्त करत आहेत .तरी ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपली रक्कम महेश को-ऑपरेटिव्ह बँकेतून घेऊन जावी असे कारखान्याच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल मधील इयत्ता दहावीच्या सीबीएससी बोर्डातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

जय भारती बहुउद्देशीय सेवाभावी प्रतिष्ठान संचलित, छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, अंबाजोगाई येथील विद्यार्थ्यांनी यावर्षीच्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नुकताच जाहीर झालेल्या निकालानुसार, एकूण ५१ विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



तसेच १५ विद्यार्थ्यांनी ८० ते ९० टक्के गुणांच्या श्रेणीत उत्तीर्ण होत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. विविध विषयांमध्ये उच्च गुण मिळवत विद्यार्थ्यांनी शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. यावर्षी स्वराज बाबासाहेब चौधरी या विद्यार्थ्याने ९८.२ टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकावला. त्याच्या पाठोपाठ साई महेश सूर्यवंशी याने 95.6% आणि विश्वजीत बाळासाहेब थोरात याने95% मिळविले.

या निमित्ताने आयोजित गुणगौरव समारंभास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अनिल मस्के सर (विभागप्रमुख, श्वसन औषधशास्त्र विभाग, एसआर टी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई), मा. श्री. अविनाशजी मुडेगावकर सर (दैनिक लोकमतचे पत्रकार) तसेच ॲड. संतोष पवार सर (अध्यक्ष – संत गाडगेबाबा सेवाभावी संस्था, जोगाईवाडी, 'आधार माणुसकीचा'), शाळेचे संचालक डॉ.ॲड. माधव जाधव सर, मा. श्री. जे.डी.थोरात सर, ॲड. अनिल लोमटे सर,आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवर ॲड संतोष पवार, डॉ अनिल मस्के व पत्रकार अविनाश मुडेगावकर यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत आपल्या यशाचे श्रेय शाळा, पालक आणि शिक्षकांना दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष *डॉ. ॲड. माधव जाधव होते. आपल्या अध्यक्षीय समारोपात नमूद केले की, शाळेने १००% निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. याप्रसंगी शाळेचे व्यवस्थापन, प्राचार्य आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा देखील दिल्या! कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या शशिकला गंगणे मॅडम यांनी,व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईशरत मोमीन मॅडम व मेघना मॅडम यांनी केले. अशा प्रकारे हा गुणगौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## नाथ्रा येथे आज विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे आ. धनंजय मुंडेंच्या हस्ते अनावरण

### आंबेडकरी अनुयायांनी उपस्थित राहण्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय मुंडे यांचे आवाहन



■ सिरसाळा प्रतिनिधी

आज दिनांक १९ एप्रिल रोजी सायंकाळी ६ :०० वाजता मौजे नाथ्रा ता. परळी वैजनाथ येथे भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व लोकार्पण सोहळा माजी मंत्री तथा परळी विधान सभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्या हस्ते होणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा नाथ्रा सारख्या ग्रामीण भागात होत आहे हि समस्त आंबेडकरी अनुयायांसाठी आनंदाची बाब आहे. सदरील कार्यक्रमास परळी तालुक्यातील समस्त आंबेडकरी समाज,अनुयायी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रम अध्यक्ष नाथ्रा गावचे सरपंच अभय मुंडे यांनी केले आहे.a

## धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोलिसांना कडक निर्देश

■ मुंबईः वृत्तसंस्था

राज्यात धर्मांतरासारखे संवेदनशील प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेऊ नका, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस प्रशासनाला बजावले आहे. आज (१८ एप्रिल) सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित गृह विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

मुख्यमंत्र्यांनी नाशिकचे धर्मांतर प्रकरण, अमरावतीतील लैंगिक शोषण आणि मुंबईतील ड्रग्ज प्रकरणांचा सविस्तर आढावा घेत तपासात अधिक गती आणि पार दर्शकता आणण्याचे आदेश दिले. **बैठकीतील महत्त्वाचे मुद्देः नाशिक धर्मांतर प्रकरणः** नाशिक पोलिसांनी हे प्रकरण स्वतःहून उजेडात आणल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले. मात्र, केवळ गुन्हे दाखल करून न थांबता यातील सर्व 'पॅटर्न' आणि धागेदोऱ्यांचा सखोल तपास करा, असा सूचना त्यांनी दिल्या. तपासातून कोणताही मुद्दा निसटता कामा नये, असे त्यांनी स्पष्ट केले. अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलिसांना संवेदनशीलपणे काम करण्याचे निर्देश दिले. पीडितांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी समुपदेशकांची मदत घ्यावी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग वाढवून त्यांना आधार द्यावा, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

इतर प्रकरणांचा आढावा: भोंदूबाबा खरात आणि मुंबईतील गोरेगाव येथील ड्रग्ज प्रकरणांचा तपास अधिक प्रभावी आणि निष्पक्षपातीपणे करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

"राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा आणणारे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. संवेदनशील प्रकरणांत योग्य तपास करून गुन्हेगारांवर कडक कारवाई करा."
— देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



## संपादकीय

# कभी हां, कभी ना...

ट्रम्प स्वतःला जगाचे शासक समजू लागलेत. त्यामुळे गोर यांचा भारत दौरा असो की आंतरराष्ट्रीय व्यासपीठ असो, भारताला धडा शिकवण्याचा ट्रम्प यांचा निर्धार आहे. पण, ट्रम्प असो वा कुणीही असो भारत कुणासमोरही झुकणार नाही.

ट्रम्प यांनी भारतासह काही देशांवर ५०० टक्के टॅरिफ लावण्याची धमकी दिली. याचे कारण भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे. याचा राग ट्रम्प यांनी भारतावर आणि ब्राझीलसारख्या काही देशांवर काढला. ट्रम्प यांच्या या संतापाचा सर्वात गंभीर परिणाम भारत, चीन आणि ब्राझील या देशांना बसणार. त्यासाठी गोर जेव्हा भारत दौऱ्यावर आले तेव्हा त्यांनी भारतावर 'सँक्शनिंग ऑफ रशिया' कायद्याला पाठिंबा देण्यासाठी भारतावर दबाव आणला नाही, पण त्यांचा हेतू आणि बोलण्याचा मथितार्थ तोच होता. ट्रम्प यांचा भारतावर ५०० टक्के टॅरिफ लावण्याचा कट असंयुक्तिक तर आहेच, पण लहरीपणाचे द्योतक आहे. ट्रम्प स्वतःला जगाचे शासक समजू लागलेत. त्यामुळे गोर यांचा भारत दौरा असो की आंतरराष्ट्रीय व्यासपीठ असो. भारताला धडा शिकवण्याचा ट्रम्प यांचा निर्धार आहे. पण, ट्रम्प असो वा कुणीही असो भारत कुणासमोरही झुकला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखा तगड्या नेत्याच्या हातात भारताची सूत्रे आहेत. त्यामुळे मोदी यांचा भारत-अमेरिकेच्या या दंडेलशाहीपुढे झुकणार नाही हे स्पष्ट आहे. हेच गोर यांच्या दौऱ्यानंतरही भारताने दाखवून दिले. ट्रम्प यांच्या या दंडेलशाहीचे कारण स्पष्ट आहे.

ट्रम्प यांना रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबवण्याचे श्रेय हवे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातीलही युद्ध संपवण्याचे श्रेय घेण्याचा त्यांनी अनेकदा प्रयत्न केला, पण भारताने त्यांच्या या बनवेगिरीला भीक घातली नाही. आता गोर यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने भारतावर आणखी एक दबाव आणण्याचा प्रयत्न ट्रम्प यांनी केला. पण गोर यांचा हा प्रयत्न भारताच्या ठाम नकारामुळे हाणून पाडला. जगभरातील युद्धे रोखून शांतता पुरस्कार मिळवण्याची ट्रम्प यांची धडपड अव्याहत सुरू आहे, पण तिला यश येत नाही. म्हणून ट्रम्प या पद्धतीने उत्तर देण्याचा प्रयत्न करत आहे. गोर यांचा दौरा कितपत यशस्वी झाला, ही बाब अलाहिदा. पण ट्रम्प यांनी असा विचार केला पाहिजे, की ५०० टक्के टॅरिफ लावला तर भारत आणि चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तू अमेरिकेत प्रचंड महाग होतील. अमेरिकेत यादवी युद्ध होईल आणि अमेरिकन नागरिक ट्रम्प प्रशासनाविरुद्ध युद्ध सुरू करतील. तसेही अमेरिकेत कामगारांचे वेतन महाग असल्याने तेथे उत्पादन खूप महाग पडते. या प्रकारे टॅरिफ वाढवल्याने अमेरिकन नागरिकांचा राग आपल्याच म्हणजे ट्रम्प यांच्याविरोधात उसळेल. तसेही ट्रम्प यांच्या मनमानी पद्धतीने टॅरिफ लावण्याच्या या प्रकाराला अमेरिकन कनिष्ठ न्यायालयाने आधीच ठोकरून लावले. भारत-अमेरिका व्यापारविषयक बोलणी अद्याप पूर्ण झालेली नाहीत. मोदी यांना अत्यंत विचाराने आणि आर्थिक आणि राजनैतिक पैलूंचा सर्व प्रकारे विचार करून निर्णय घेतला पाहिजे. मोदी सरकारने सध्या आर्थिक स्थैर्य यांचा विचार करून निर्णय घ्यायला हवा. ट्रम्प यांच्या धमकीपुढे घाबरून जाऊ नये. ट्रम्प यांच्या टॅरिफच्या तोडीसतोड म्हणून भारताने ब्रिक्स आणि ट्रम्प यांच्या टॅरिफने असेच जे पोळलेले देश आहेत त्यांच्याबरोबर येऊन काम केले. ट्रम्प जेव्हा म्हणतात, की सत्तेमुळे माझ्या नैतिकतेला चाप लावला आहे, तेव्हा समजून जा; की ट्रम्प यांचे हे विधान म्हणजे ढोंगीपणाचे द्योतक आहे. पण त्याविरोधात कारवाई करताना ट्रम्प यांच्या आततायी विधानांकडे लक्ष न देता भारताने आपले वास्तव पाहिले पाहिजे. दोन्ही सेन्सेक्स आणि निफ्टी याच आठवड्यात २.५ टक्क्यांनी कोसळले. परदेशी गुंतवणूकदारांनी १.३ अब्ज डॉलरची गुंतवणूक देशातून बाहेर काढून नेली. रुपया कोसळून ९०.१६च्या वर उतरला आणि यात जागतिक अनिश्चित वातावरण भर टाकत आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध संपुष्टात येण्याची चिन्हे नाहीत आणि इराण आणि व्हेनेझुएलाने आंतरराष्ट्रीय अस्थिर परिस्थितीत आपल्या परीने भर टाकली. पण ट्रम्प यांनी धमकी दिली असली तरी भारतासमोर काही पर्याय आहेत. त्यापैकी एक आहे तो म्हणजे निर्यात बाजारपेठेत विविधता आणणे. त्यासोबत मेक्सिको, चीन आणि ब्रिक्स देशांबरोबर भारताने व्यापार वाढवण्याची तयारी सुरू केली पाहिजे. त्याद्वारेच भारत ट्रम्प यांच्या दादागिरीला उत्तर देऊ शकतो. भारताचा ब्रिटनबरोबर मुक्त व्यापार करार झाला. तेव्हापासूनच ट्रम्प यांचा पारा चढला आणि भारताला कसा धडा शिकवू असे त्यांना झाले. ट्रम्प यांनी टॅरिफ भरमसाट प्रमाणात लावण्यासाठी जी धमकी दिली, त्यात आणखी एक आव्हान आहे. ते म्हणजे नवीन बाजारपेठा मिळवण्याचा खर्च.

पण तातडीचा उपाय हाच आहे, की ट्रम्प यांच्या दादागिरीला भारताने जशास तसे उत्तर दिले पाहिजे. त्यासाठी भारताने ब्रिक्स देशांशी व्यापक समझोते केले पाहिजेत आणि भारत आणि इंग्लंडच्या धर्तीवर ब्रिक्स देशांशीही तशाच पद्धतीने करार केल्यास ट्रम्प यांचे नाक आपोआप दाबले जाईल. भारताने नुकतीच अमेरिकन ट्रेझरी बाँडमधील आपली गुंतवणूक झपाट्याने कमी केली. यामुळे ट्रम्प यांच्या नाकातोंडात पाणी गेले. हा धक्का ट्रम्प आणि डॉलरसाठी प्रचंड मानला जातो. भारताने गुंतवणुकीचे अन्य पर्याय शोधलेत. एका आकडेवारीनुसार भारताने ३१ ऑक्टोबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान अमेरिकन गुंतवणूक तब्बल २१ टक्क्यांनी कमी केली. आता टॅरिफनंतर ही गुंतवणूक झपाट्याने कमी होत आहे. गोर यांच्या दौऱ्याचा काही उपयोग झाला नाही. उलट भारताचा ट्रम्प यांच्या दादागिरीपुढे न झुकण्याचा निर्धार वाढला. दुसरा धक्का भारताने काही देशांसोबत रुपयांमध्ये व्यवहार सुरू केले आणि हाही ट्रम्प यांना धक्का मानला जातो. सिल्व्हर लायनिंग अशी, की भारताची अर्थव्यवस्था आणखी मजबूत आहे. हे मत भारतीयाचे नाही; न्यूयॉर्क टाइम्सने हे वृत्त प्रसिद्ध केले. अमेरिकेतच ट्रम्प यांच्या टॅरिफच्या निर्णयाला कसा विरोध होत आहे हे समजून येते. गोर यांच्या दौऱ्याचा उपयोग भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार युद्ध कमी करण्याच्या दृष्टीने तर झाला नाही. पण अमेरिका हे समजून जाईल, की भारताला आता दादागिरीने नमवणे शक्य नाही. येथे नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे हे त्यानी लक्षात घेतले तरी पुरे.

# शिवहार लहाने यांची महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या पुणे जिल्हा कार्यवाह पदी बिनविरोध निवड

**(पुणे) वृत्तसंस्था**

म.ए.सो वाघीरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सासवड येथील सहा. शिक्षक शिवहार लहाने यांची अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या पुणे जिल्हा कार्यवाह पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या पुणे जिल्हा कार्यकारिणीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत पुणे जिल्हाध्यक्ष निलेश काशीद यांनी शिवहार लहाने यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद ही शिक्षकहित, शिक्षणहित व राष्ट्रहित या विचाराने कार्य करणारी शिक्षकांची अग्रगण्य राज्यव्यापी संघटना असून आजपर्यंत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक मतदार संघातून अनेकवेळा या शिक्षक संघटनेच्या व्यक्तींनी शिक्षकांचे प्रतिनिधित्व केलेले आहे. आगामी काळात पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे संघटनात्मक काम प्रभावीपणे करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध शैक्षणिक समस्या सोडविणे तसेच पुणे जिल्ह्यात शाळा तिथे शिक्षक परिषदेचा कार्यकर्ता हा उपक्रम राबविणार असल्याचा निर्धार सुद्धा त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पुणे जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध शैक्षणिक व शासन स्तरावरील समस्यांची सोडवणूक व्हावी यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी पुणे येथे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी संवाद बैठक आयोजित केली जाईल, शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नयेत यासाठी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय व हक्कासाठी काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी आपल्या मनोगतातून सांगितले. आगामी नोव्हेंबर - डिसेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषद पुणे विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या



पार्श्वभूमीवर शिवहार लहाने यांची झालेली निवड महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या संघटनात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानली जात आहे. लहाने यांचा पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील शिक्षकांचा असलेला थेट संपर्क संघटनेच्या विस्तारासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष वेणूनाथ कडू, पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार भगवानराव साळुंखे, नागपूर विभागाचे माजी शिक्षक आमदार नागो. गाणार, पुरंदर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय शिवतारे, आमदार राहुल कुल, माजी आमदार संजय जगताप, माजी आमदार संग्राम थोपटे, माजी आमदार अशोक टेकवडे, राज्य कार्याध्यक्ष गुलाबराव गवळे, राज्य कोषाध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी, पुणे विभागाचे संघटन मंत्री रामदास अभंग, संजीव मांढरे, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे, प्राचार्य दत्ताराम रामदासी,प्राचार्य अशोक दहिफळे, भाऊसाहेब खोसे, प्राचार्या पूजा जोग, महेश शेलार, दिपक भोसले, राजेंद्र बडे,अरुण खेडकर, दत्तात्रय गायकवाड, विजय पिलाने आदींनी अभिनंदन केले आहे.

## लोकार्थ

### एलआयसीचे मायएलआयसी ॲप आणि सुपर सेल्स साथी ॲप लौंच




अर्थ मंत्रालय, वित्तीय सेवा विभागाचे सचिव, श्री. एम. नागराजू, आयएएस, यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. आर. दोराईस्वामी, व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश पंत, श्री. रत्नाकर पटनायक, श्री. आर. चंदर आणि एलआयसी ऑफ इंडियाच्या वरिष्ठ व्यवस्थापनाच्या उपस्थितीत एलआयसीचे नवीन ग्राहक ॲप (मायएलआयसी) आणि विक्री मध्यस्थांसाठीचे मोबाईल ॲप (एलआयसीचे सुपर सेल्स साथी) सादर केले. मायएलआयसी हे एक अत्याधुनिक मोबाईल ॲप्लिकेशन आहे, जे पॉलिसीधारक त्यांच्या जीवन विमा पोर्टफोलिओचे व्यवस्थापन कसे करतील याचा अनुभव नव्याने परिभाषित करण्यासाठी तयार केले आहे. सुपर सेल्स साथी ॲप हे एलआयसीच्या विपणन कर्मचाऱ्यांसाठी एक अत्याधुनिक मोबाईल ॲप्लिकेशन आहे. हे ॲप्स वापरकर्त्याला प्राधान्य देण्याच्या तत्त्वज्ञानाने तयार केले आहेत, जे एक अखंड, बुद्धिमान आणि वैयक्तिकृत ३६०-अंशाचा अनुभव देण्यासाठी सहजसोपे डिझाइन, शक्तिशाली वैशिष्ट्ये आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान एकत्र आणतात.एलआयसी ऑफ इंडियाचे पुढच्या पिढीचे डिजिटल ॲप्स ग्राहक अनुभवात परिवर्तन घडवणे, मध्यस्थांना सक्षम करणे आणि अंतर्गत कामकाजाचे आधुनिकीकरण करणे यावर स्पष्ट लक्ष केंद्रित करून तयार केले आहेत. एआय (AI) सह प्रगत तंत्रज्ञानाने तयार केलेल्या या ॲप्सचा उद्देश एक अखंड, सुरक्षित आणि पूर्णपणे एकात्मिक डिजिटल विमा परिसंस्था प्रदान करणे आहे.

### सिटियस ट्रान्सनेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्टचा इश्यू विक्रीसाठी खुला




सिटियस ट्रान्सनेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्टने आपल्या इश्यूसाठी ९९ – १०० प्रति युनिटचा किंमतपट्टा निश्चित केला आहे. ट्रस्टचा इश्यू सबस्क्रिप्शनसाठी १७ एप्रिल, २०२६ रोजी खुला होईल आणि २१ एप्रिल, २०२६ रोजी बंद होईल. या इश्यूमधून मिळणारे एकूण उत्पन्न अंदाजे ११,०५०.०० दशलक्ष आहे. इश्यूमधून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नापैकी १०,०००.०० दशलक्ष पर्यंतची रक्कम एसआरपीएल रोड्स प्रायव्हेट लिमिटेड आणि काही ओळखल्या गेलेल्या प्रोजेक्ट एसपीव्ही म्हणजेच थ्रिसूर एक्सप्रेसवे लिमिटेड जोराबत शिलाँग एक्सप्रेसवे लिमिटेड धोला इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि दिबांग इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सिक्युरिटीजच्या आंशिक किंवा पूर्ण अधिग्रहणासाठी (किंवा लागू असेल त्याप्रमाणे, रिडेम्प्शनसाठी) वापरण्याचा प्रस्ताव आहे, आणि उर्वरित रक्कम सामान्य उद्देशांसाठी वापरली जाईल. सिटियस ट्रान्सनेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट हा वाहतूक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणारा एक पायाभूत सुविधा गुंतवणूक ट्रस्ट आहे. याची स्थापना भारतात रस्ते यांसह विविध वाहतूक पायाभूत सुविधा मालमत्तांचा संच संपादित करणे, त्याचे व्यवस्थापन करणे आणि त्यामध्ये गुंतवणूक करणे या उद्देशाने करण्यात आली आहे.

### CheQ आणि एयू स्मॉल फायनान्स बँकचे को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड


भारताची आघाडीची क्रेडिट मॅनेजमेंट प्लॅटफॉर्म CheQ ने आज एयू स्मॉल फायनान्स बँक भारतातील सर्वात मोठी स्मॉल फायनान्स बँक यांच्या भागीदारीत CheQ एयू क्रेडीट कार्डच्या लॉन्चची घोषणा केली. भारतातील पहिले अशा प्रकारचे को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड, पेमेंट सुलभ करणे, रिवॉर्ड्स वाढवणे आणि भारतातील बदलत्या खर्चाच्या सवयींशी सुसंगत असे एकत्रित क्रेडिट अनुभव देण्याचा उद्देश ठेवते. या लॉन्चसह CheQ ने केवळ क्रेडिट कार्ड बिल पेमेंट प्लॅटफॉर्मवरून पुढे जात कार्ड इश्यूअन्स आणि रिवॉर्ड्स-आधारित कॉमर्सच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे.१५ दशलक्षांहून अधिक क्रेडिट कार्ड्स आणि ४ दशलक्ष वापरकर्त्यांच्या इनसाइट्सवर आधारित CheQ एयू क्रेडीट कार्ड आजच्या क्रेडिट अनुभवातील प्रमुख पोकळ्या भरून काढतो जिथे रिवॉर्ड्स तुकड्यांत विभागलेले आहेत, रिडेम्प्शन प्रक्रिया गुंतागुंतीची आहे आणि पारंपरिक कार्ड्स ग्राहकांच्या बदलत्या वर्तनाशी जुळवून घेण्यात मागे राहिली आहेत.CheQ एयू क्रेडीट कार्ड हे एम्बेडेड LED-आधारित टॅप-इंटरॅक्शन असलेले भारतातील पहिले को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड आहे.

### इव्होनिथ स्टीलकडून २,000 कोटी रुपयांच्या भांडवल उभारणीची घोषणा

इव्होनिथ स्टीलने आपल्या विद्यमान कर्जाचे रिफायनान्स करण्यासाठी १,७५० कोटी रुपयांचे नवीन कर्ज उभारल्याची घोषणा केली आहे. या रिफायनान्सिंग प्रक्रियेचा उद्देश कर्जाचा खर्च कमी करणे, कर्जाचा कालावधी वाढवणे आणि विद्यमान, तसेच भविष्यातील विकास योजनांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक स्थिरता वाढवून कंपनीची भांडवली रचना सुधारणे हा आहे. या व्यवहाराचे अंडररायटिंग व सिंडिकेशन स्टँडर्ड चार्टर्ड आणि जेपी मॉर्गन चेस बँक, एन. ए., मुंबई शाखा यांनी केले आहे.तसेच, कंपनीने एचडीएफसी म्युच्युअल फंड कडून आणखी २५० कोटी रुपयांचे नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्स (एनसीडी) उभारले आहेत, ज्यामुळे उच्च श्रेणीतील आर्थिक संस्थांमधील कंपनीची विविधता अधिक दृढ झाली आहे. जे.पी. मॉर्गन इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने या एनसीडीसाठी स्ट्रक्चरिंग ॲडवायजर म्हणून काम पाहिले.कंपनीने यापूर्वी क्रिसिल रेटिंग्ज़कडून 'एए-; स्टेबल' (AA-; STABLE) रेटिंग मिळवल्याचे जाहीर केले होते, ज्याची मार्च २०२६ मध्ये पुन्हा पुष्टी करण्यात आली. या रेटिंगमधून इव्होनिथ स्टीलच्या पाठीशी असलेल्या घटकांमधील व्यवस्थापनाने केलेल्या सुधारणा दिसून येतात. ऑक्टोबर २०२४ मध्ये जाहीर केलेल्या कंपनीच्या मागील कर्जाची आता पूर्णपणे परतफेड करण्यात आली आहे.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

### महात्मा बसवेश्वर हे केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान समाजशास्त्रज्ञ



समाजात बदल घडवून आणण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी विचारांमध्ये परिवर्तन आवश्यक असते. बसवेश्वरांनी हेच कार्य केले. त्यांनी लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणला आणि समाजाला नव्या दिशेने नेले. आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज आहे, कारण सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आवश्यक आहे. महात्मा बसवेश्वर हे केवळ एक संत नव्हते, तर ते एक महान समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून सर्वसमावेशक विकासाचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावाद, समता आणि न्याय यांचा समन्वय आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही तितकेच प्रभावी आणि प्रेरणादायी आहेत.

अखेरीस असे म्हणता येईल की महात्मा बसवेश्वरांचे कार्य आणि विचार हे भारतीय समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचा अंगीकार केला, तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. समतेवर आधारित, न्यायपूर्ण आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती करण्यासाठी बसवेश्वरांचे विचार मार्गदर्शक ठरतील. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा घेऊन आपण एक समताधिष्ठित, मानवतावादी आणि प्रगत समाज निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहूया, हेच त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# सावधान! राज्यात २० ते २२ एप्रिल दरम्यान वादळी पाऊस तसेच; गारपिटीचीही शक्यता ?

**मुंबई वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून उष्म्याचा तडाखा सहन करणाऱ्या महाराष्ट्रासाठी हवामान विभागाने चिंतेची बातमी दिली आहे. राज्यात २० ते २२ एप्रिल दरम्यान वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, काही ठिकाणी गारपिटीचा इशाराही देण्यात आला आहे. वाढत्या तापमानामुळे हैराण झालेल्या नागरिकांना आता निसर्गाच्या या लहरीपणाचा सामना करावा लागणार आहे.

- **कोणत्या भागांना बसणार फटका?**
- **हवामान अंदाजानुसार, पावसाचा जोर प्रामुख्याने खालील विभागांत जास्त असेल:**
- **पश्चिम महाराष्ट्र: पुणे विभाग आणि प्रामुख्याने घाट परिसरात ढगाळ हवामानासह पावसाची शक्यता.**
- **मराठवाडा: दक्षिण मराठवाडा आणि छत्रपती संभाजीनगर विभागात विजांच्या कडकडाटासह पाऊस होऊ शकतो.**
- **विदर्भ: अमरावती विभागासह विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाचे संकेत आहेत.**
- **खानदेश: उत्तर खानदेशातही पावसाचा प्रभाव जाणवेल.**

**वातावरणात मोठे फेरबदल**

तापमानाचा पारा चाळीशी पार: गेल्या आठवड्यापासून राज्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर गेल्याने उष्माघाताचा धोका वाढला आहे. दुर्दैवाने आतापर्यंत उष्माघातामुळे दोघांचा मृत्यू झाला आहे.

**गारपिटीचे संकेत:** २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाचे क्षेत्र विस्तारणार असून, दुपारनंतर मेघगर्जनेसह काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. २२ एप्रिलपासून पावसाची तीव्रता हळूहळू कमी होईल.

**शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा**

अचानक होणाऱ्या हवामान बदलामुळे शेती पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांना तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. काढणीला आलेली पिके सुरक्षित स्थळी हलवावीत आणि जनावरांची योग्य काळजी घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. दुपारी घराबाहेर पडताना कडक उन्हापासून संरक्षण करा आणि वादळी पावसाच्या वेळी झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबणे टाळा.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# लातूरमध्ये गृहउद्योग प्रदर्शनीचे परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन

## महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी 'ब्रँडिंग' आवश्यक - नगराध्यक्षा सौ .पद्मश्रीताई धर्माधिकारी







**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

महिलांमध्ये उपजतच उत्तम व्यवस्थापन कौशल्य असते. त्यांच्या घरगुती उत्पादनांना जर योग्य बाजारपेठ आणि ब्रँडिंगची जोड मिळाली, तर त्या जागतिक स्तरावर आपले नाव कोरू शकतात. अशा प्रदर्शनांमुळे महिलांच्या आत्मविश्वासाला खऱ्या अर्थाने बळ मिळते असे प्रतिपादन परळी वैजनाथ नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

परशुराम जन्मोत्सव समिती-२०२६ आणि बीबीएन महिला मंडळ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने औसा रोडवरील कल्पतरु मंगल कार्यालय येथे आयोजित 'गृहउद्योग प्रदर्शनी'च्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. शुक्रवारी मोठ्या उत्साहात या प्रदर्शनीचे उद्घाटन संपन्न झाले. सौ पद्मश्रीताई. धर्माधिकारी यांनी पुढे बोलतांना सांगितले की, केवळ चूल आणि मूल यात न अडकता महिलांनी आपल्या छंदाचे रूपांतर व्यवसायात केले पाहिजे. परशुराम जन्मोत्सव समितीने महिलांसाठी उपलब्ध करून दिलेले हे व्यासपीठ कौतुकास्पद असून, यामुळे स्थानिक उत्पादनांना मोठी चालना मिळेल. या प्रदर्शनीमध्ये विविध महिला बचत गटांनी तयार केलेले मसाले, घरगुती लोणची, हस्तकला, सुती कपडे आणि सजावटीच्या वस्तूंचे स्टॉल्स आकर्षणाचे केंद्र ठरले होते. लातूरकरांनी या प्रदर्शनीला भेट देऊन महिला उद्योजिकांचे कौतुक करावे असे आवाहन त्यांनी केले..

परशुराम जन्मोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. संजय पांडे यांनी प्रास्ताविकात या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीबीएन महिला मंडळ आणि परशुराम जन्मोत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्याला लातूरमधील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त जन्मोत्सव व शोभायात्रेचे कल्याणकारी हनुमान मंदिर न्यू माणिकनगर परळी येथे आज आयोजन


**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त कल्याणकारी हनुमान मंदिर येथे दि 15 ते 19 एप्रिल या कालावधीत आयोजित विविध कार्यक्रमांतर्गत सकाळी 10 ते 1 परमरहस्य पारायण ,दुपारी 1ते 3 महाप्रसाद व दुपारी 4 ते 6

कल्याणकारी महिला भजनी मंडळ, इच्छापूर्ती महिला भजनी मंडळ, माणिक नगर महिला भजनी मंडळ ,बसवेश्वर महिला भजनी मंडळ,जिव्हेश्वर महिला भजनी मंडळ,सेवाभावी शंभू महादेव महिला भजनी मंडळ ,वैद्यनाथ महिला भजनी मंडळ,गुरुलिंगस्वामी महिला भजनी मंडळ,सुर्वेश्वर सेवाभावी महिला भजनी मंडळ ,शंभू महादेव महिला भजनी मंडळ,शिवकन्या महिला भजनी मंडळ,शनेश्वर महिला भजनी मंडळ या विविध महिला भजनी मंडळाचे भजनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता आज दि 19 रोजी होणार असून त्यानिमित्ताने दुपारी 12वाजता जगतज्योती महात्मा बसवेश्वर जन्मोत्सवाचा कार्यक्रम होणार असून त्यानंतर 1 ते 3 या दरम्यान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी 6 वाजता भव्य अशी शोभायात्रा निघणार असून त्याचा मार्ग पुढीलप्रमाणे आहे कल्याणकारी हनुमान मंदिरापासून निघून माणिक नगर हनुमान चौक ती छत्रपती शिवाजी महाराज चौक , नाथ चित्र मंदिर हिंगलाज माता चौक (दोस्ती टी हाऊस )ते वडर कॉलनी परळी मार्गे परत कल्याणकारी हनुमान मंदिराकडे येणार आहे या शोभा यात्रेत सोलापूर येथील प्रसिद्ध कलापथक वीरभद्र




पुरवंत संघ सहभागी होणार असून यात विविध महिला भजनी मंडळ व महिलांच्या पावलांचा कार्यक्रम होणार आहे या सर्व कार्यक्रमासाठी सर्व वीरशैव समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.



तरी सर्व समाज बांधवांनी जन्मोत्सव,महाप्रसाद व शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन वीरशैव लिंगायत समाज न्यू माणिकनगर परळी यांनी केले आहे.

### श्री बालाजी वैजनाथराव गुट्टे व सौ. मंदोदरी बालाजी गुट्टे यांच्या चारधाम यात्रेनिमित्त

# श्री ज्ञानोबाराय चरित्र कथा व त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**परळी वैजनाथ :** तालुक्यातील दैठणा घाट येथे श्री बालाजी वैजनाथराव गुट्टे व सौ. मंदोदरी बालाजी गुट्टे यांच्या चारधाम यात्रेनिमित्त श्री संत ज्ञानोबाराय चरित्र कथा व त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा २२ ते २५ एप्रिल २०२६ दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडणार असून पंचक्रोशीतील भाविकांसाठी ही आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.

या महोत्सवात प्रमुख कथावाचक म्हणून श्री ह.भ.प. सर्वदर्शनाचार्य कृष्णा महाराज गुट्टे हे श्री संत ज्ञानोबाराय चरित्र कथेद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच कीर्तनासाठी ह.भ.प. श्री अर्जुनजी महाराज लाड (गुरुजी), ह.भ.प. श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर, ह.भ.प. श्री जयवंत महाराज बोधले, ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महाराज मोठे माऊली यांसह अनेक नामवंत कीर्तनकार सहभागी होणार आहेत. कथा संगीत साथ म्हणून मुदंगाचार्य श्री बुवासाहेब महाराज सोलापूरकर, गायनाचार्य श्री पांडुरंग महाराज खोंडे (आळंदी देवाची) व सिंथवादक श्री माऊली महाराज जालनेकर यांची साथ लाभणार आहे.

बुधवार दि. २२ एप्रिल रोजी सकाळी ८ ते १० श्री संत ज्ञानोबाराय चरित्र कथा, १० ते १२ मातृ पितृ पूजन व ग्रंथतुला दुपारी २ ते ४ कीर्तन व रात्री ८ ते १० हरिकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार असून सकाळी कलश पूजन सोहळा संपन्न होईल. यावेळी आमदार रत्नाकर गुट्टे व प्रगतिशील शेतकरी विश्वासराव कचरे पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. गुरुवार दि. २३ एप्रिल रोजी संतपूजन, संत मिरवणूक, रामकृष्णहरी नामजप व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी संत चरित्र कथा, कीर्तन व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या सोहळ्यात विशेष उपस्थिती म्हणून पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (मंत्री, पशुसंवर्धन व पर्यावरण, महाराष्ट्र राज्य), श्री धनंजय पंडितराव मुंडे (माजी मंत्री), श्री संजय दौंड (माजी आमदार) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तसेच या महोत्सवात मातृपितृ मिरवणूक व मातृपितृ पूजन सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले असून, कार्यक्रमाच्या



यशस्वीतेसाठी समस्त तरुण मंडळ व समस्त गावकरी मंडळ, दैठणा घाट परिश्रम घेत आहेत. मंडप डेकोरेशनची व्यवस्था महेश साऊंड सर्व्हिस, हेळंब यांच्या वतीने करण्यात आली आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या त्रिदिवसीय कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्री ज्ञानोबा वैजनाथराव गुट्टे, श्री तुकाराम वैजनाथराव गुट्टे, श्री व्यंकटी वैजनाथराव गुट्टे, श्री उध्दव वैजनाथराव गुट्टे, श्री भागवत वैजनाथराव गुट्टे, आहे श्री गोविंद कुंडलिकराव गुट्टे, श्री भगवंत केशवराव गुट्टे, सौ. मुक्ताबाई विठ्ठलराव मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अभ्यास, संघर्ष आणि जिद्दीनेच घडते यशस्वी व्यक्तिमत्त्व : प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर




**सिरसाळा (प्रतिनिधी)**

येथील श्री पंडितगुरु पार्डिकर महाविद्यालय, सिरसाळा, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. के. पाटील होते, तर श्री योगेश कदम यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात डॉ. हरिभाऊ कदम, प्रा. डॉ. विक्रम धन्वे, प्रा. डॉ. अरुणा वाळके, प्रा. दयानंद झिंजुर्डे यांची उपस्थिती होती. प्रस्ताविक प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी केले.

मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ज्ञान, मेहनत आणि संघर्ष यांचे जिवंत प्रतीक आहेत. त्यांनी दिवसाचे अठरा तास अभ्यास करून स्वतःला घडवले. आजच्या विद्यार्थ्यांनीही किमान दहा तास अभ्यास करण्याचा संकल्प करून मोठ्या ध्येयाकडे वाटचाल केली पाहिजे."

"बाबासाहेबांना केवळ पुतळ्यांमध्ये न पाहता पुस्तकांमधून आणि आपल्या कृतीतून जगले पाहिजे. खरे अभिवादन म्हणजे त्यांच्या विचारांचे आचरण होय," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्याचे आणि संशोधनाची आवड निर्माण करण्याचे आवाहन केले.

"परिस्थितीवर तक्रार न करता चिखलातून उमलणाऱ्या कमळाप्रमाणे स्वतःला विकसित करा. पराभवाने माणूस संपत नाही, प्रयत्न न केल्याने तो संपतो," हा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी दिला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. के. के. पाटील यांनी डॉ. आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचा गौरव करताना विद्यार्थ्यांना न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास सुमारे ६० विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शेवटी प्रा. डॉ. अरुणा वाळके यांनी आभार मानले.

# किरण शिनगीरे यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)-**

आष्टीचे युवा सामाजिक कार्यकर्ते किरण भगवानराव शिनगीरे यांच्या अभिष्टचिंतन दिनानिमित्त शुक्रवार दिनांक 17 एप्रिल रोजी विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला, तसेच प्रत्यक्ष भेटून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी युवा नेते जयदत्त भैय्या धस यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर सागर आप्पा धस, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, भगवानराव शिनगिरे, सभापती रमजान तांबोळी, सरपंच युवराज पाटील, संचालक रामशेठ मधुरकर, माजी सरपंच सतीश शेठ धस, भाजपा तालुका अध्यक्ष रमेश गावडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के, झुंजार नेताचे उपसंपादक उत्तमराव बोडखे, सरपंच संदीप खकाळ, सरपंच सुखदेव खोटे, सरपंच अशोक मुळे, सरपंच सागर, दहातोंडे, सरपंच संदीप मार्कंडे, सरपंच शहाजी साप्ते, सरपंच विठ्ठलराव राख, संभा दादा कर्डिले, भाऊसाहेब तावरे, अरुण पडोळे, महेश कोकणे, सरपंच पोपट गोंडे, राम धुमाळ, सरपंच चव्हाण डोंगरगण, माजी सरपंच नवनाथ नागरगोजे, माजी सरपंच छगन शिनगिरे, माजी सरपंच संजय पोकळे, माजी सरपंच अतुल कोठुळे, रावसाहेब मुटकुळे, विजय खकाळ, बाळासाहेब खकाळ, गौतम खंडागळे, मेजर विकास मस्के, उपसरपंच संतोष मुटकुळे, युवराज मुटकुळे उपसरपंच बाळासाहेब थोरवे, संस्थाचालक दिलीप वायबसे, संस्थाचालक, वैजिनाथ निर्मळ, अमोलक जैन



विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश शेठ भंडारी,सचिव हेमंत शेठ पोखरणा, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, डॉ. महेंद्र पटवा, संजय मेहेर, युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार रामदास जाधव, पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी, पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार अण्णासाहेब साबळे, पत्रकार समीर शेख, पत्रकार अक्षय विधाते, पत्रकार शरद गर्जे, पत्रकार संतोष नागरगोजे, पत्रकार भीमराव गुरव, पत्रकार आदिनाथ ठोंबरे, पत्रकार मनोज पोकळे, विस्ताराधिकारी काळे, ग्रामविकास अधिकारी नवनाथ लोंढे, अमोल धोंडे, पांडुळे, देविदास जरांगे, संपत कोळेकर, बापू आहेर, दीपक शिरोळे, बबन वायकर, बाळू पोकळे, महादेव जाधव, भाऊसाहेब शिरोळे, तुकाराम गोंदकर सर, घुले सर, सय्यद सर, विकास शिनगिरे, बळीराम शिनगिरे, राजू खकाळ, प्रवीण शिनगिरे, महेश शिनगिरे, दत्ता मिसाळ, अमोल जाधव, प्रवीण कासार, एकनाथ गायकवाड, कृष्णा शेलार, सुशांत नरवडे, गुड्डू पोकळे, निलेश पोकळे, ईश्वर कर्डिले, सचिन शेलार, सह भगवान दादा शिनगिरे युवा मंच आष्टी तालुका, जी एस किरण शिनगिरे मित्रपरिवार, वटनवाडी ग्रामस्थ सह आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर नवजीवन संगोपन केंद्र आष्टी येथील विद्यार्थ्यांना अन्नधान्य, किराणा आणि खाऊ देऊन वाढदिवस साजरा केला.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार 19 एप्रिल 2026



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेमुळेच भारताची अखंडता कायम - अंजली धानोरकर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर समस्त भारतीयांचे उद्धारकर्ते - महादेव किरवले

## सिरसाळ्यात महामानवांचा जयंती सप्ताह उत्साहात संपन्न





**सिरसाळा | प्रतिनिधी :**

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेमुळेच भारताची अखंडता टिकून आहे," असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी केले. सिरसाळा येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मुख्य सोहळ्यात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, "१९४७ साली इंग्रजांनी भारत सोडला तेव्हा देश भौगोलिक व सामाजिकदृष्ट्या विखुरलेला होता. विविध संस्थाने, जाती, धर्म आणि भाषांच्या वैविध्यातून या देशाला एकसंघ राष्ट्र बनविण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून केले." त्यांनी महाडचा चवदार तळे सत्याग्रह, गोलमेज परिषद, पुणे करार आणि संविधान निर्मितीतील बाबासाहेबांच्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनाचा उल्लेख केला. तसेच "समाज प्रगत करायचा असेल, तर वाचनाशिवाय पर्याय नाही," असा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी मुंबईचे उपजिल्हाधिकारी महादेव किरवले होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे उद्धारकर्ते आहेत. त्यांच्या योगदानामुळेच समाजात समता आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रत्येकाला प्राप्त झाला आहे." यावेळी माजलगावचे उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांनी तरुणांना मार्गदर्शन करताना सांगितले, "संघर्षातूनच यश प्राप्त होते. शील आणि कर्तव्यनिष्ठा जोपासणे, हेच महामानवांना खरे अभिवादन आहे."

सिरसाळा येथे दरवर्षी ११ ते १७ एप्रिल या कालावधीत 'महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सप्ताह' साजरा केला जातो. यावर्षीही विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर महामानवांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्रिसरण-पंचशील ग्रहण करण्यात आले. या प्रसंगी सहाय्यक आयुक्त समाधान किरवले, पोलीस अधिकारी सुशांत सोनवणे, सचिन वंजारे, नेते तानाजी व्हावळे, अभ्यासक भगवान साकसमुद्रे, पत्रकार मिलिंद चोपडे, बाबा किरवले, माजी सरपंच मधुकर झिंजुर्डे, सचिन रणखांबे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मधुकर किरवले, प्रमोद किरवले, जयंती समितीचे अध्यक्ष अमोल किरवले, प्रकाश चोपडे, आबा कांबळे, प्रकाश उजगरे, बापू किरवले यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. डॉ. विक्रम धन्वे यांनी तर आभार रामदादा किरवले यांनी मानले.

# प्रशिक्षीत कार्यकर्ता भाजपाच्या विचारधारेचा कणा

## भाजपा प्रशिक्षण शिबिर उद्घाटन प्रसंगी युवा नेते ऋषिकेश कराड यांचे प्रतिपादन

**लातूर | प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टी जगात एक नंबरचा राजकीय पक्ष आहे. कार्यकर्त्यांना शंभर टक्के न्याय देणारा एकमेव भाजपा पक्ष आहे. प्रशिक्षित कार्यकर्ता हा भाजपाचा कणा असून कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे, कष्टामुळे पक्षाने यशाची अनेक सर्वोच्च पदे प्राप्त केली आहेत असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत औसा तालुक्यातील भादा मंडल प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शनिवारी करण्यात आला. या प्रसंगी जिपच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पंस उपसभापती शरद दरेकर, जिप सदस्य महादेव साळुंके, प्रशिक्षण वर्ग जिल्हा सहसंयोजक रोहिदास वाघमारे, जिप सदस्या सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, जिप सदस्य संदिपान शेळके, पंस सदस्या सौ. भाग्यश्री साळुंके, पंस सदस्य परमेश्वर लांडगे, भाजपा मंडल अध्यक्ष उद्धव काळे, प्रताप पाटील, सुरज शिंदे, रुपेश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण वर्गात ९० भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुखांनी सहभाग घेतला.

जनतेची सेवा करण्यासाठी भारतीय जनता पक्ष निवडणुकीना सामोरे जातो निवडणुकीतून मिळालेल्या पदाच्या माध्यमातून सर्वच लोकप्रतिनिधींनी जास्तीत जास्त जनतेची कामे केली पाहिजे त्यांच्या अडीअडचणी सोडवल्या पाहिजेत असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, प्रत्येक बूथ स्तरापर्यंत भाजपा पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करावी पक्षाचे संघटन यशाकडे घेऊन जाण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. कार्यकर्त्यांना पक्षाची शिस्त असावी, जबाबदारीचे भान असावे यासाठी प्रशिक्षण वर्ग असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

सत्ता आली की काही जणांची नाराजी वाढते मात्र सत्तेच्या काळातही विविध कामाच्या माध्यमातून जनतेचे सेवक समजून जनतेला आनंदी ठेवण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे केंद्र आणि राज्य शासनाने गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या अनेक योजना सुरू केले आहे या योजनेचा लाभ गरजूंना आणि पात्र लाभार्थ्यांना मिळून देण्यासाठी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी कार्यरत राहावे असेही ऋषिकेश दादा कराड यांनी बोलून दाखविले. प्रारंभी मंडल अध्यक्ष उद्धव काळे यांनी प्रास्ताविक भाषणातून मंडळातील भाजपाच्या कामाचा आढावा दिला.

या प्रशिक्षण शिबिरात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अंमलबजावणी, सोशल मीडिया यासह विविध विषयावर रोहिदास वाघमारे, सुरज शिंदे, पद्माकर चिंचोलकर, चंद्रकांत कातळे, दिलीप पाटील, नवनाथ मुरकुटे यांनी सत्रातील विषयानुसार आपले विचार मांडले. प्रत्येक सत्रात सत्रप्रमुख म्हणून मान्यवरांची उपस्थिती होती.

# नॅचरल शुगर युनिट 2 च्या बायो सिएनजी प्रकल्पाच्या फिडींग स्टेशनचा शुभारंभ



**महागाव | प्रतिनिधी**



नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि., युनिट नंबर 2 गुंज येथे नव्याने उभारणी होत असलेल्या प्रतिदिन 6 मे. टन क्षमतेच्या बायो सीएनजी प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या मे 2026 मध्ये या प्रकल्पाची चाचणी घेण्याचे नियोजन केले आहे. या प्रकल्पाच्या प्रेसमड फिडींग स्टेशनचा शुभारंभ नुकताच बुधवार दि.15/4/2026 रोजी नॅचरल उद्योग समूहाचे प्रमूख कृषीरत्न श्री.बी. बी. ठोंबरे चेअरमन व कार्यकारी संचालक यांचे शुभहस्ते करण्यांत आला. तसेच या प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल नेपीयर गवत बेणे कारखाना शेजारील गावातील शेतक-`यांना मोफत देण्याची योजना कारखाना व्यवस्थापनाने केली आहे. साखर उद्योगांशी संलग्नित बायो सीएनजी प्रकल्प उभारणीची संकल्पना नॅचरल शुगरने विदर्भात सर्वप्रथम आमलात आणली असून या प्रकल्पामूळे महागांव, पुसद व उमरखेड भागातील शेतक-यांच्या आर्थीक प्रगतीसह या परिसरातील गरजुंना रोजगार उपलब्ध करून देण्याची अत्यंत महत्वपुर्ण भुमिका नॅचरल शुगरने घेतली आहे. त्यामूळे साखर उद्योगासह बायो सीएनजी प्रकल्प यशस्वी करण्यासाठी व आर्थीक कांती घडविण्यासाठी शेतक-यांनी सकारात्मक सहकार्य करावे. असे आवाहन यावेळी बी.बी. ठोंबरे चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी केले.

सदर प्रकल्पाच्या युनिटचा शुभारंभ प्रसंगी कारखाना स्थळी प्रकल्प सल्लागार मशिनरी पुरवठादार व कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना करा

## पालकमंत्री अतुल सावे : कायदा व सुव्यस्थेच्या अनुषंगाने घेतला आढावा

**नांदेड | प्रतिनिधी**

जिल्ह्यात अलीकडे घडलेल्या गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस विभागाने अधिक दक्षता घ्यावी, तसेच शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली कायदा व सुव्यवस्थेबाबत बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी आश्विनी जगताप, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नांदेड शहरात महिन्याच्या सुरुवातीला दोन दिवसांत घडलेल्या पाच खुनांच्या घटनांचा उल्लेख करत पालकमंत्री श्री. सावे यांनी ही बाब चिंताजनक असल्याचे नमूद केले. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर लक्ष ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

शहर व जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर विशेष लक्ष ठेवावे, एमपीडीए अंतर्गत कारवाई वाढवावी, तसेच अचानक धाडी टाकून गुन्हेगारीला आळा घालावा, असेही त्यांनी सांगितले. अवैध वाळू उत्खनन, गुटखा, मटका व अंमली पदार्थांवर कठोर कारवाई करावी तसेच कुठल्याही राजकीय दबावाला बळी न पडता कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी स्थानिक गुप्तवार्ता वाढविण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस विभागाच्या अडचणी शासन स्तरावर सोडवण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत, सीसीटीव्ही प्रकल्प, पदभरती, पोलीस वसाहत व पोलीस आयुक्तालयाच्या प्रस्तावांबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर प्रभावी



उपाययोजना राबवून नागरिकांचा विश्वास दृढ करण्यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी जिल्ह्यात मागील दीड वर्षातील गुन्हेगारीत झालेल्या घट व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचे सादरीकरण केले. पुढील काळातही जिल्ह्यात शांतता राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी 20 ते 24 एप्रिल 2026 दरम्यान पालक व विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली.